# प्रकरण ३ रे - *अंगणवाडी शिक्षणाची पार्श्वभूमी*

३.१ जगातील अंगणवाडी शिक्षणाची पार्श्वभूमी.

३.२ भारतातील अंगणवाडी शिक्षणाची पार्श्वभूमी.

३.३ भारतातील अंगणवाडी शिक्षणातील काहि प्रयोग.

३.४ भारतातील अंगणवाडी शिक्षणासंबधी शासकीय आयोगाच्या शिफारसी.

३.५ महाराष्ट्रातील अंगणवाडी शिक्षणाचा इतिहास.

३.६ सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी शिक्षणाचा इतिहास.

३.७ दक्षिण सोलापूर तालुक्यातील अंगणवाडी शिक्षणाचा इतिहास.

३.८ महाराष्ट्र समाज कल्याण खाते.

३.९ महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ.

३.१० महाराष्ट्र शासन बालवाडया .

३.११ जिल्हा परिषद बालवाडया.

# प्रकरण ३ रे *अंगणवाडी शिक्षणाची पार्श्वभूमी*

## ३.१ *जगातील अंगणवाडी शिक्षणाची पार्श्वभूमी*

अंगणवाडी शिक्षणाबाबत शिक्षणतज्ञांनी परातन काळापासून विचार केलेला दिसून येतो. त्या कळी शिक्षणाची सामाजिक व्यवस्था करण्याची कल्पना कोणाच्या मनात येणे शक्यच नव्हती. म्हणून प्लेटोने जरी अंगणवाडी शिक्षणाबाबत आपले विचार नमूद केले असले तरी त्यांचे स्वरुप गृह शिक्षणाचेच आहे. त्यामुळे हे शिक्षणकार्य विशेष करुन मातेने करावे अशी त्यांची कल्पना होती. त्यात त्यांनी मुलांना गोष्टी सांगण्याचा कार्यक्रमात विशेष स्थान दिले आहे. या बालगोष्टीची निवड तात्विक व नैतिक दृष्टीने करावयास हवी असे म्हटले आहे.

पाश्चात्य राष्ट्रामध्ये नव्या शिक्षणाचे युग रुसोपासून सुरु झाले आहे असे मानले जाते. रुसोच्या शैक्षणिक कल्पनांची बैठक नवी समान रचना निर्माण करावी अशी आहे. त्याचबरोबर त्यांनी शिक्षणपध्दतीत क्रांती घडवून तिला नविन रुप देण्याचा विचार केला रुसोच्या विचारात अंगणवाडी शिक्षणाचा समावेश आहे. परंतु त्याला विशेष वेगळे असे स्थान नाही. त्यानी ज्ञानेंद्रिय शिक्षणाबाबतची विशेषता ध्यानात घेऊन हे शिक्षण निसर्गाच्या सानिध्यात व्हावे अशी त्यांची कल्पना होती. रुसोच्या विचारांना कृतीत उतरविण्याचा प्रयत्न पेस्टालॉझीने केला आहे. त्यांनी मातेला पहिला गुरु मानून तिला या शिक्षणात महत्वाचे स्थान दिले आहे.

अंगणवाडी शिक्षणाच्या सामाजिक व्यवस्थेच्या शास्त्रीय दृष्टीने सामाजिक व्यवस्थेला शास्त्रीय दृष्टीने विचार करणारा पहिला शिक्षणतज्ञ म्हणजे फ्रोबेल होय. त्यांनी १८२७ साली एक बालमंदिर सुरु करुन आपल्या विचारांना कृतीत

उतविण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी आपल्या पध्दतीला किंडरगार्डन म्हणजे बालोद्यान असे नांव दिले. त्यांनी आपलया शिक्षण पध्दतीत गाणी - गोष्टी - व्यवसाय खेळ हस्तकौशल्याची कामे इत्यादी गोष्टी व्यवसाय खेळ हस्तकौशल्याची कामे इत्यादी गोष्टींना यथायोग्य स्थान दिल्यामुळे त्यांच्या अंगणवाडी शिक्षणाला विशेष असा आकार प्राप्त झाला फ्रोबेलच्या या पध्दतीने जगातील सर्व राष्ट्राचे हळहळू वेधून घेतले. आज अंगणवाडी शिक्षणाच्या क्षेत्रात जगातील निरनिराळया राष्ट्रामध्ये हिच बालोद्यान पध्दती कमी अधिक फरकाने चालू आहे. मानशास्त्रातील प्रगतीमुळे फ्रोबेलच्या मूळ शिक्षणपध्दतीत बराच बदल घडून येत आहे.

फ्रोबेलच्या काळी इंग्लडमध्ये अंगणवाडी शिक्षणाच्या सामाजिक व्यवस्थेकडे लक्ष देण्याची कल्पना दोन व्यक्तिमध्ये अगदी भिन्न अशा कारणाने निर्माण झाली आहे. त्याती एक रॉबर्ट ओवेन हा कारखानदार होता. इंग्लडमध्ये १८ व्या शतकाच्या शेवटी तांत्रिक शोधामुळे औद्योगिक क्रांती झाली. त्यामुळे नविन कारखाने निघाल्यामुळे स्त्री - पुरुषांना आपले घर सोडून ठराविक वेळ कारखान्यात राहण्याची वेळ आली. त्यामुळे घरी मुलांची आबाळ होवू लागली. एवढेच नव्हे तर मुलांनाही कारखान्यात कामाला लावण्याची प्रवृत्ती होवू लागली होती. म्हणून रॉबर्ट ओवेनने अडीच ते सहा वयाच्या मुलांसाठी आपल्या कारखान्यातच एक शाळा सुरु केली या शाळेत त्यांनी शिक्षण पध्दतीचा फारसा विचार केलेला नव्हता. म्हणून या गोष्टीला जरी शैक्षणिक फारसे महत्व नसले तरी सामाजिक महत्व बरेच आहे. त्याकाळी कारखानदारांनी आपल्या कारखान्यात मुलांसाठी पाळणाघर व बालमंदिर चालविण्यास सुरुवात केली. त्यामुळे आजच्या काळात कारखान्यातील कामगांराच्या मुलांची जी समस्या आहे त्या समस्येचा विचार रॉबर्ट यांनी फार पुर्वीच केलेला होता. म्हणून या कल्पनेचा उगम रॉबर्ट ओवेनच्या शाळेतूनच झाला आहे.

इंग्लडमध्ये या शिक्षणाची सुरुवात करण्यात मार्गरेट मॅक्मिलन या बाईचे कार्यही अतिशय महत्वाचे आहे. मुलांचे आरोग्य व शारिरीक विकास याकडे लहानपणीच विशेष लक्ष दयावयास हवे म्हणून या बाईने एक शाळा सुरु केली या शाळेत बालसंगोपनाची दृष्टी विशेष महत्वाची होती यासाठी त्यांनी "नर्सरी स्कूल" या नांवाने एक पुस्तक प्रसिध्द केले. रॉबर्ट ओवेन व मार्गरेट मॅक्मिलन या दोघांच्या कामाची पार्श्वभूमी तात्कालीक विशिष्ट अशी सामाजिक परिस्थितीच होती.

डॉ.मॉंटेसरी यांनी पूर्वप्राथमिक क्षेत्रातील कामाला १९०७ पासून सुरुवात केली. त्यापूर्वी त्यांनी वैद्यकशास्त्राचा अभ्यास करुन इटाई व सेग्विन यांनी अनुसरुन जन्मजात, मानसिक उणिवा असलेल्या मुलांमध्ये काम केले होते. यामुळेच त्यांचे लक्ष या शिक्षण व्यवस्थेकडे वळले त्यासाठी त्यांनी या शिक्षणशास्त्राचा रितसर अभ्यास करुन आपल्या नविन विचाराना वाचा फोडली या विचाराप्रमाणेच त्यांनी काम करावे अशी सुचना मागासवर्गासाठी घरे बांधणा-या रोम गावाच्या एका समितीने त्यांना केली या समितीने तेथे शाळा स्थापन केली.

डॉ. मॉंटेसरीने त्या शाळेत स्वच्छता व्यवस्था, गृहरचना, कौशल्य, खाण्यापिण्याची व्यवस्था व त्यासंबंधीची कामे हा त्या शाळेचा मुख्य कार्यक्रम होता. डॉ. मॉंटेसरीनी सुरुवातीस या शिक्षणाच्या साधनांबाबत काहीच विचार केला नव्हता. परंतु या प्रारंभिक कामांत मुलांची प्रगती पाहून त्यांना रीतसर शिक्षण देण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरु केलेत. या प्रयत्नातून मॉंटेसरी साधनांची निर्मिती झाली. त्यांच्या या साधनांमध्ये ज्ञानेंद्रियशिक्षण, गणितशिक्षण व भाषा शिक्षण यासाठी स्वतंत्र साधने तयार केलीत.

डॉ. मॉंटसरीनी आपल्या अनुभवातून या शिक्षणार एक पुस्तक लिहून ते १९१२ मध्ये प्रसिध्द केले. हे पुस्तक इंग्रजी भाषेत असल्यामुळे जगात या



15618

पध्दतीच्या प्रचारास या पुस्तकाचा खूप उपयोग झाला. तसेच मॉंटेसरीनी आपल्या आयुष्यातील ४० - ४५ वर्षे स्वतःच्या शिक्षण् पध्दतीचा प्रचार व प्रसार करण्याकडेच लक्ष दिले. या काळात त्यांनी आपल्या साधनांत व त्यांच्या उपयोगात वेळोवळी सुधारणाही केल्या. त्यांच्याशिक्षण पध्दतीत अंतर्भूत असलेली तत्वे मुसोलीच्या फॅसिस्ट राजवटीला मान्य नव्हती म्हणून त्यांना देशातून हद्दपार करण्यात आले. याच काळात त्यांचा मुक्काम भारतात जवळ जवळ दहा वर्षे होता. या काळातच भारतात त्यांनी या शिक्षणपध्दतीचा प्रचार व प्रसार केला. त्यामुळे भारतात आज या शिक्षण पध्दतीला महत्वाचे स्थान मिळाले आहे.

## ३.२ *भारतातील अंगणवाडी शिक्षणाची पार्श्वभूमी*

भारतात अंगणवाडी शिक्षणाची सुरुवात १९ व्या शतकापासून झाली आहे. त्यावेळी लॉर्ड कर्झन हा भारताचा व्हाईस रॉय होता. त्याच्याच काळात किंडगार्डन पध्दती आपल्या देशात सुरु झाली. त्यामुळे त्या पध्दतीचा परिणाम आपल्या शिक्षणक्षेत्रात व विशेषतः प्राथमिक शिक्षणात आजही दिसून येते आहे. त्या काळात काही अंगणवाडी संस्था, शाळाही निघाल्या होत्या. त्यापैकी ब-याच संस्था खिस्ती मिश-यांनी काढल्या. किंडरगार्डन पध्दतीचे एक ट्रेनिंग कॉलेज सोलापूर येथे सुरु केले. आजही या संस्थेचे कार्य उल्लेखनिय आहे. त्याकाळी सुरु केलेल्या संस्थांपैकी आणखी एक संस्था त्यावेळेच्या बडोदा राज्यात (आजचे गुजरात) आहे. तसेच त्या राज्यात सरकारी किंडरगार्डन शाळाही अनेक काढल्या गेल्या व त्यामुळे खाजगी अंगणवाडी संस्था काढण्यास प्रेरणा मिळाली.

भारतात शिशुच्या अध्यापनाची व्यवस्था १८८७ पासून करण्यात आली आहे. त्यावेळी पाच वर्षे पूर्ण झालेल्या मुलांनाच या शाळांमध्ये प्रवेश मिळत असे. परंतु चार वर्ष वयाची मुलेही शाळेत येत असत व त्यांनाही प्रवेश मिळत असे त्यामुळे चार वर्षाच्या मुलांना बालोद्यान पध्दतीने शिकवावे असा विचार

करुन प्राथमिक शाळेतच बालवर्गाची सुरुवात करण्यात आली होती. या वर्गात गाणी, गोष्टी, खेळ अशा कार्यक्रमांना स्थान देण्यात आले. परंतु या शाळेत प्राथमिक शाळेच्या अभ्यासक्रमाच्या अनुसरुन पूर्वतयारी करुन घेण्याकडेच विशेष लक्ष दिले जात होते.

भारतात १९१४ साली मॉंटेसरी पध्दतीची पहिली शाळा मद्रासजवळ अडयारला सुरु झाली. या शिक्षणपध्दतीचा प्रसार व्हावा म्हणून भावनगरचे गिजूभाई व ताराबाइ मोडक या दोघांनी बराच प्रयत्न केला आहे. मुंबई राज्यात १९१५ मध्ये मॉंटेसरी शाळेची स्थापना "बडोदे जिल्ह्यातील वासते" या गावी झाली. भावनगर येथे १९२५ मध्ये पहिली "मॉंटेसरी परिषद" भरली. श्रीमती ताराबाई मोडक व श्री. गिजूभाई बधेका, यांच्या संयुक्त प्रयत्नानी त्याच वर्षी 'नुतन बालशिक्षण संघाची' स्थापना झाली.

"नुतन बालशिक्षण संघ" या नावाची शिक्षण संस्था सुरु झाल्यावर या शिक्षणाचा बराच प्रसार होवून गावोगावी बालमंदिरे व शिशुसदने निघण्यास सुरुवात झाली. या शाळेमध्ये अध्यापन करणारी व पालकांनी या वयोगटातील मुलांशी कसे वागावे हे त्यांना कळावे व मुलांच्या घरगुती वातावरणातील अडचणी स्पष्ट व्हाव्यात या उद्देशाने गिजूभाईनी गुजराती भाषेत शिक्षण - पत्रिका सुरु केली. ताराबई मोडक यांनी मराठी आवृत्ती सुरु केली. त्याकाळी गिजूभाई आणि ताराबाई यांनी संपादित केलेली ८० - ९० बालवाङःमय आजही लोकप्रिय आहेत.

या शिक्षणाचे काम ब-याच प्रमाणात सुरुवातीस शहरातून झाले. शिक्षणाचा प्रसार व प्रचार खेडेगावातही व्हावा म्हणून "नूतन बाल शिक्षण संघाने" लक्ष दिले त्यासाठी प्रसारकार्य शिक्षण - पत्रिकेद्वारे करण्यात आले होते. याबाबतीत ५ वर्षे विशेष संशोधन करुन प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्याचे पहिले पाऊल

नुतन बालशिक्षण संघाने डिसेबंर १९४५ मध्ये बोर्डी ग्रामबालशिक्षण केंद्र सुरु केले व त्या केंद्राचे नेत्वृत्व श्रीमती ताराबाई मोडक यांच्याकडे देण्यात आले.

भारतात माँटेसरी पध्दतीच्या प्रचाराचे मुख्य कारण म्हणजे भावनगरला दक्षिणामुर्ती संस्थेत गिजूभाई बधेका व ताराबाई मोडक यांनी सुरु केलेले अध्यापन मंदिरे होय. या अध्यापन मंदिरातील शिक्षण सुरवातीला पूर्णपणे माँटेसरी पध्दतीचे नव्हते. परंतु या अध्यापन पध्दतीमुळे माँटेसरी शिक्षण प्रसारास पुष्कळच चालना मिळाली. डॉ. माँटेसरी आपल्या देशातून हद्दपार होवून तेथे आल्या तेंव्हा त्यांना स्वताच्या पध्दतीचा प्रसार करण्यासाठी तयार असलेले क्षेत्र मिळाले.

माँटेसरी भारतात आल्यानंतर त्यांनी या शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून अनेक शिक्षकांना प्रशिक्षण दिले म. गांधीजींच्या आदेशानुसार साबरमती आश्रामत माँटेसरी बाईनी हरिजन मुलांसाठी १९४० साली एक शाळा सुरु केली. त्यांच्या कार्यर्हक्रमामुळेच आजा आपल्या देशात निरनिराळया राज्यात सुरुवात सुमारे सत्तर बालअध्यापन संस्था अंगणवाडी प्रशिक्षणाचे काम करीत आहेत. त्यापैकी कांही अध्यापन संस्था सरकारी आहेत. या अध्यापन संस्थेमध्ये बालोघान पध्दतीचे शिक्षण दिले जात आहे. तर काही अध्यापन संस्थेमध्ये अन्य शिक्षणपध्दती बाबतही शिक्षण दिले जात आहे.

सन १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला आणि तेंव्हापासून ते आजपर्यंच्या काळात अंगणवाडी शिक्षणाच्या प्रसारात केल्या जाणा-या प्रयत्नामुळेच या स्तरावरील शिक्षणाचा विकास झाल्याचे दिसून येत आहे. भारत सरकानेच अंगणवाडी शिक्षणात लक्ष घालण्यास सुरुवात केली आहे. तसेच देशातील अनेक खाजगी संघटनानी या शिक्षणाचा प्रसारार्थ शाळा सुरु केल्या आहेत. भारत सरकारने या शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून केंद्रिय समाजकल्याण मंडळाची स्थापना केली आहे. भारतात अंगणवाडी शिक्षण ही एक समाज कल्याणाची बाब

समजली जाते म्हणूनच या मंडळाकडे अंगणवाडी शिक्षणाच्या विकासाचे काम सोपविण्यात आले आहे.

सन १९६२ मध्ये या मंडळाच्या वतीने बालकल्याणार्थ एकात्म कल्याण उपक्रमांची सुरुवात झाली. तसेच १९६७ मध्ये बालक आणि माता यांच्या कल्याणार्थ कार्यक्रम सुरु करण्यात आले. इ.सन १९६८-६९ च्या शेवटी या केंद्रामार्फत सुरु केलेल्या बालवाडयांची संख्या १५६८७ होती.

देशामध्ये खाजगी संस्थानी चालविलेल्या बालवाडयांना अनुदान देण्यासाठी मंडळाने अनुदान योजना आखली. पहिल्या व दुस-या पंचवार्षिक योजनेच्या काळात २१७४ खाजगी बालवाडयांना या योजनेच्या फायदा झाला.तर तिस-या पंचवार्षिक योजनेच्या काळात ४८१६ खाजगी बालवाडयांना अनुदान देण्यात आले.मंडळाच्या अनुदानातून शिक्षिकाचे पगार साहित्य विकत घेणे आणि उपलब्ध सेवांचा दर्जा वाढविणे यासाठी रक्कम खर्च करावी अशी अपेक्षा होती.

मंडळाने अंगणवाडी शिक्षणाच्या क्षेत्रात केलेली ही कामगिरी फार मोलाची आहे हे विसरता येणार नाही.परंतु अंगणवाडी शिक्षणाचा एकंदर व्याप लक्षात घेता हे प्रयत्न फारच कमी पडतात असे म्हणावे लागते. सन १९७१ च्या खानेसुमारी नुसार तीन ते पाच वयोगटातील बालकांची संख्या ४१७.५ लक्ष होती आणि यापैकी फक्त २,६५,४१९ बालके बालवाडयात शिकत होती याचा अर्थ असा की अदयाप अंगणावाडी शिक्षणाच्या स्तरावर खूपच काम व्हावयाचे आहे.

"आता पर्यत अंगणवाडी शिक्षणाच्या विकासासाठी जे थोडे फार प्रयत्न झाले आहेत त्यामुळे या स्तरावरील शिक्षणात थोडी चालना मिळाली आहे हे खालील कोष्टकावरुन स्पष्ट होते."[१]

---

१) पाटील लीला / कुलकर्णी विश्वंभर - "आजचे शिक्षण : आजच्या समस्या" पुणे : श्रीविद्या प्रकाशन २ री आवृत्ती - १९७४. पा.क्र. १८.

## कोष्टक क्रमांक १

## *अंगणवाडी शिक्षणाचा विकास (१९६७-६८)*

| अ.क्र. | राज्य /प्रदेश | एकूण संख्या | एकूण शिक्षक | एकूण विद्यार्थी | विद्यार्थी -शिक्षक प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | आंध्रप्रदेश | ७४ | १६० | १२,१४४ | ७६ |
| २ | गुजरात | ६४५ | १,५२२ | ५०,३४४ | ३३ |
| ३ | मध्यप्रदेश | २८२ | ५४५ | २५,८१५ | ४७ |
| ४ | मद्रास | ६१ | १५८ | ४,४२६ | २८ |
| ५ | म्हैसूर | ७४१ | १,२३४ | ४२,८१८ | ३५ |
| ६ | महाराष्ट्र | ५१२ | १,४४१ | ३७,८०५ | २० |

## ३.३ *भारतातील अंगणवाडी शिक्षणातील कांही प्रयोग*

अंगणवाडी शिक्षणाच्या बाबतीत बालशिक्षण भारतीय दृष्टिकोनातून कसे देता येईल यासाठी देशातील विविध शिशु संघटना व बालकल्याण संस्था यांच्या मार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. काश्मिर मध्ये ग्रामीण भागातील बालकांचे शिक्षण स्थानिक साधने वापरुन कृतीद्वारा कसे देता येईल यासंबंधी प्रयोग करण्यात येत आहे. अशा तऱ्हेचे प्रयोग दिल्ली रामपूर व महाराष्ट्रातील ठाणे जिल्हातील बोर्डी या ठिकाणी करण्यात येत आहेत.

भारतातील अंगणवाडी शाळामध्ये दिले जाणारे शिक्षण सर्वत्र एकाच प्रकारचे दिले जात नाही.तसेच नुतन बालशिक्षण संघाने स्वीकारलेल्या पध्दतीचा ही वापर सुरु केला आहे. नर्सरी स्कूल या श्रीमंत वर्गा करताच चालविला जात आहेत. त्यामुळे तेथील फी व अन्य खर्च सर्वसामान्य जनतेला कधीच परवडणारा

नाही. मिशनरी यांनी चालविलेल्या कॉन्व्हेन्ट स्कूलमध्ये इग्रजी भाषा व ख्रिश्चन धर्म यावर विशेष भर दिलेला दिसून येतो.

भारतीय शिशुकल्याण परिषद आणि केन्द्रीय समाज कल्याण मंडळ या संस्थानी अंगणवाडी शिक्षणात हातभार लावला आहे. खाजगी संस्थामधल्या नूतन बालशिक्षण संघ दादर, असोसिएशन मॉंटेसरी इटरनॅशनल नर्सरी स्कूल प्रोजेकेट मद्रास शिशु-विहार मंडळ यवतमाळ या संस्थाच्या अंगणवाडी शाळा व प्रशिक्षण केंद्रे आहेत. या केंद्रामध्ये या शिक्षणासंबंधी सतत प्रयोग केले जात आहेत.

हिंदुस्थानी समितीसंघ, सेवाग्राम वर्धा हॅपी एज्युकेशन सोसायटी दिल्ली बालकानती बाली, किशोर दल पाटणा , यासंस्थाच्याही शाळांमध्ये या स्तरावरील शिक्षणासंबंधी प्रयोग केले जात आहेत. शासनाच्या समाज कल्याण विभागातर्फे शहरातील गलिच्छ वस्तीतून व ग्रामीण भागात प्रायोगिक तत्वावर बालवाडया चालविल्या जात आहेत. समाजातील कांहि खाजगी समाज सेवा संस्थाही अंगणवाडी शाळा चालवित आहेत. अलीकडे देशातील मोठमोठया शहरांमध्ये काहि नामवंत शिक्षण संस्थानाही अंगणवाडी शिक्षण विभाग सुरु केलेले आहेत.

अंगणवाडी शिक्षणाच्या क्षेत्रात काम - करणा-या कांही भारतीय संघटना.

१) कस्तुरबा गांधी नॅशनल मेमोरियल ट्रस्ट.

२) हरिजन सेवक संघ.

३) भारतीय ग्रामीण महिला संघ या संघाने कार्यक्रम २५०० गांवात १५ राज्यात सुरु आहेत या संघामार्फत बालवाडया अंगणवाडया चालवल्या जातात.

४) आदिम जाती सेवक संघ - आदिवासी जमातीमधील लोकांच्या सेवेसाठी या संघाची स्थापना झाली आहे.

५) ऑल इंडिया विमेन्स कॉम्फरन्स (AIWA) स्त्रीयांच्या व मुलांच्या कल्याणासाठी या संस्थेमार्फत कार्यक्रम आयोजित केले जातात.

६) दी इंडियन असोसिएशन फॉर फ्री स्कूल एज्युकेशन या संस्थेची स्थापना इ.स. १९६४ मध्ये झाली आहे. अंगणवाडी शिक्षणाचा दर्जा सुधारणे हा या संस्थेचा प्रमुख हेतु आहे.

## ३.४ *भारतातील अंगणवाडी शिक्षणासंबंधी शासकीय आयोगांच्या शिफारसी*

> सार्जंट अहवाल (१९४४)

"स्वातंत्र्यापूर्व काळात (१९४७ पूर्वी) पूर्वप्राथमिक शिक्षणाकडे फारसे लक्ष दिले जात नसे. आपल्या देशातील शिक्षणाच्या इतिहासात पूर्वप्राथमिक स्तरांचे महत्व प्रथमतः १९४४ च्या सार्जंटच्या सरकारी अहवालात मान्य करण्यात आले आणि ते राष्ट्रीय शिक्षण पध्दतीचे एक महत्वाचे उपाय (अॅडजंकट) मानण्यात येवून त्याला पुरेशी तरतुद करावी अशी सार्जंटच्या अहवालाने शिफारस केली."[२] स्त्री शिक्षिकांना या विषयीचे प्रशिक्षण दयावे. पूर्वप्राथमिक शिक्षण मोफत असावे. या शिक्षणात औपचारिक शिक्षणापेक्षा विद्यार्थ्यांना सामुहिक जीवनाची अनुभूती दयावी असे सुचविले होते.

> श्रीमती सुलभाबाई पापांदीकर समिती (१९४९)

"मुंबई राज्य सरकारने श्रीमती सुलभाबाई पाणदीकर यांच्या अध्यक्षतेखाली १९४९ साली पूर्वप्राथमिक शाळांचे कार्य व त्यांना देण्यात येणारे अनुदान यासंबधी पाहणी करण्यासाठी एक समिती नेमली होती. या समितीने पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत"[३]

---

२) पारसनिस म.रा. - "शिक्षणाची तात्वीक व समाजशास्त्रीय भूमिका" पुणे : नूतन प्रकाशन प्रथम आवृत्ती १९८७. पा.क्र. ३२४.

१) कायम स्वरुपाचे राज्य पूर्वप्राथमिक शिक्षण मंडळ स्थापन करावे.

२) या शाळांच्या तपासणीकरीता बालशिक्षणशास्त्र असे तपासणी अधिकारी नेमावेत.

३) या शाळांना मान्य त्याच्या साडेतेहतीस टक्के अनुदान द्यावे.

४) पूर्वप्राथमिक शिक्षणशास्त्राचे अध्ययन केलेल्या शिक्षिकांना प्राथमिक शाळामधील पहिल्या व दुस-या इयत्तांचे शिक्षक नियुक्त करण्यास पात्र समजण्यात यावे.

५) पूर्वप्राथमिक अध्यापन विद्यालयांच्या दर्जा प्रथमिक अध्यापन विद्यालय इतकाच असावा.

## ➢ मुदलीयार आयोग (१९५२ - ५३)

मुदलीयार आयोगानेही पूर्वप्राथमिक शिक्षणासंबधी उल्लेख केला आहे. पूर्वप्राथमिक शिक्षणात साह्यार्थ आणि मनोरंजन हालचालीमधूनच हळूहळू जीवनाची ओळख करुन द्यावी. त्यांना स्वच्छता, आरोग्य, सामूहिक जीवन याविषयीच्या सवयी लावाण्यात असे विचार मांडले आहेत.

सन १९५८ मध्ये पूर्वप्राथमिक शिक्षणाचा सुयोग्य असा अभ्यासक्रम बनविण्यासाठी शासनाने देशातील शिक्षणतएाची एक कमिटि नियुक्त केली होती. या कमिटिने बालोद्यान, नर्सरी आणि मँटेसरी पध्दतीचे सयोग्य असे एकत्रीकरण करुन एक नवा असा अभ्यासक्रम तयार केला होता.

## ➢ भारतीय शिक्षण आयोग (१९६४ - १९६६)

"भारतीय शिक्षण आयोग १९६४ - ६६ च्या अहवालात पूर्वप्राथमिक

---

३) जोशी ग.ब. "शैक्षणिक प्रशासन"
पुणे : जोशी प्रकाशन प्रथम आवृत्ती १९६१ पा. क्र. २१२.

"शिक्षणाची उद्दिष्टे व महत्व यांचा निर्देष केला आहे. पूर्वप्राथमिक शिक्षण सार्वत्रिकरण करता येणार नाही. हे मान्य करून ही आयोगाने काही महत्वाच्या शिफारशी केल्या आहेत."[४]

१) शिक्षण खात्याने प्रायोगिक तत्वावर पूर्वप्राथमिक शाळांची स्थापना करावी.

२) खाजगी संस्थाना अनुदान देऊन पूर्वप्राथमिक शाळा काढण्यास प्रोत्साहन घावे.

३) पूर्वप्राथमिक शिक्षण हे एक ते तीन वर्षाचे असावे व ते वयाच्या तिसऱ्या वर्षापासून सहा वर्षापर्यंत ऐच्छिक ठेवावे.

४) पुढील वीस वर्षात तीन ते पाच वयोमर्यादितील पन्नास टक्के मुलांना या शिक्षणाचा फायदा व्हावा.

५) सुरुवात म्हणून एक वर्षाचा पूर्वप्राथमिक शिक्षण वर्ग प्राथमिक शाळांना जोडावा त्यामुळे प्राथमिक शिक्षणातील गळती व स्थगन कमी होऊ शकेल.

६) योग्य अभ्यासक्रम आणि स्वरुप शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे म्हणून राज्यातील शिक्षणशास्त्र संस्थेने पूर्वप्राथमिक शिक्षणाची केंन्द्र सुरु करावीत.

७) पूर्वप्राथमिक शिक्षणाचा लाभ सर्व स्तरांवरील मुलांना व्हावा म्हणून राज्य शिक्षण संस्था शिक्षणाखाते आणि जिल्हा पातळीवर शिक्षणाधिकारी यादी प्रयत्न.

८) इ.स. १९८६ पर्यंत देशातील तीन ते पाच वयाच्या मुलांपैकी पन्नास टक्के व पाच ते सहा वर्षे वयोगटातील पन्नास टक्के

---

४) पाटील लीला / कुलकर्णी विश्वंभर - "आजचे शिक्षण : आजच्या समस्या" पुणे : श्रीविघा प्रकाशन २ री आवृत्ती - १९७४. पा.क्र. २५ - २६.

मुलांना पूर्वप्राथमिक शिक्षण संस्थात प्रवेश द्यावा.

९) प्रत्येक राज्यातील शिक्षणशास्त्र संस्थेत व प्रत्येक जिल्ह्यातही पूर्वप्राथमिक शिक्षणाचे विकास केंद्र स्थापन करावे.

१०) पूर्वप्रथमिक शिक्षणक्षेत्रात नवनवीन प्रयोग करुन पाहण्यास व विशेषता कमी वर्षाच्या पध्दती शोधण्या-या संशोधनास उत्तेजन द्यावे.

११) पूर्वप्राथमिक पातळीवरील शैक्षणिक कार्यक्रम लवचिक स्वरुपाचा असावा विविध प्रकारचे खेळ, हस्तव्यवसाय व शैक्षणिक संस्कारासाठी क्रियात्मक कार्यक्रम असे त्यांचे स्वरुप असावे.

१२) राज्य सरकारांनी पूर्वप्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय करावी या स्तरावरील शिक्षणाबाबतच्या संशोधनात उत्तेजन द्यावे. पूर्वप्राथमिक शिक्षण विषयक वाङःमय तयार करावे आणि राज्य पातळीवर व जिल्हापातळीवर क्रिडा-केंद्र चालवावित.

> *राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (१९८६)*

शहरी भागात पूर्व प्राथमिक शिक्षणाचा प्रयोग व प्रसार बराच झालेला आहे. परंतु त्याचा फायदा श्रीमंत व सुखवस्तु कुटुंबातील मुलेच घेवू शकतात. कारण या शाळेमधील शिक्षण फार महाग असते. पूर्वप्राथमिक शिक्षणाला पुरेसे अनुदान मिळत नसल्याने मध्यमवर्ग, अतिमध्यमवर्ग व मागासवर्ग यांच्या मुलांना ते मिळू शकत नाही. म्हणून १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पूर्वप्राथमिक शिक्षणाला महत्वाचे स्थान देण्यात आलेले आहे.

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने बालकांच्या विकासावर फार भर दिला आहे. बालकांच्या विकासाचे स्वरुप लक्षात घेवून पोषण, आरोग्य, शारिरीक,

मानसिक, भावनिक व नैतिक इ. विकासाच्याबाबतीत बालसंगोपान व बालशिक्षण यांना अग्रक्रम देण्यात आला आहे. बालशिक्षणाचे कार्यक्रम बालकांना प्राधान्य देणारे असते. त्यांच्या शिक्षणात खेळांना महत्व आहे व मुले खेळाद्वारे शिकतील, मुलांच्या विकासात मदत होईल असे खेळ निवडले जातील. या स्तरावर औपचारीक शिक्षण पध्दतीचा अवलंब केला जाणार नाही. लिहणे, वाचणे व गणित शिकविले जाणार नाही. स्थानिक समाजाचा यात पूर्ण सहभाग राहिल." [५]

"बालसंगोपान व बालशिक्षण ह्या योजनेचा फायदा औपचारीक शिक्षणापासून जे समाजातील अति दुर्लक्षित स्तर आहेत त्याच्यासाठी विशेष करुन होणार नाही. ते सामाजिक स्तर पुढील प्रमाणे आहेत." [६]

१) शहरातील झोपडपट्टया

२) ज्या मुलांना घरकाम करुन दूर अंतरावरुन लाकूडफाटा, वैरण, पाणी आणावे लागते.

३) ग्रामीण भागातील मजूर कुटुंबातील मुले आणि ग्रामीण कामगांराची मुले.

४) असंघटीत कार्यक्षेत्रातील काम करणारी मुले.

५) भटक्या जातीची मुले.

६) शहरी व ग्रामीण विभागातील बांधकाम करणा-यां कामगारांची मुले.

७) भूमीहिन शेतकी मजूरांची मुले.

८) डोंगराळ भागातील आणि अतिदूर भागातील मुले.

---

५) "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६"
शैक्षणिक आवाहनाकडून कृती कार्यक्रमाकडे"
पुणे : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे ३०.
आवृत्ती मे १९८७ पा.क्र. १२८.

६) पारसनीस न.रा. "शिक्षणाची तात्वीक व समाजशास्त्रीय भूमिका"
पुणे : नुतन प्रकाशन - प्रथम आवृत्ती १९८७ पा.क्र. ३२५.

बालसंगोपन व बालशिक्षण योजनेत इ.स.२००० पर्यंत ६ वर्षापर्यंतच्या ७० टक्के मुलांना फायदा व्हावा अशी अपेक्षा आहे. ह्या योजनेची १९९० पर्यंत अडीच लाख केंद्रे, १९९५ पर्यंत दहा लाख केंद्रे व २००० पर्यंत वीस लाख केंद्रें स्थापन करण्यात येणार आहेत.

## ३.५ *महाराष्ट्रातील अंगणवाडी शिक्षणाचा इतिहास*

महाराष्ट्रातील अंगणवाडी शिक्षणाची अध्यापनाची व्याख्या १९८७ पासून करण्यात आली आहे. त्यावेळी ५ वर्षे पूर्ण झालेल्या मुलांना शाळेत प्रवेश मिळत असे. परंतु ४ वर्षाची मुलेही शाळेत येत व त्यांनाही प्रवेश मिळत असे. परंतु अशा मुलांना बालोद्यान (Kindregarden) पध्दतीने शिकवावे असा विचार करुन प्राथमिक शाळेत बालवर्गाची सुरुवात करण्यात आली. या बालवर्गाची निर्मितीही आपल्या राज्यातील अंगणवाडी शिक्षणाचे मूळ उगमस्थान होय.

महाराष्ट्रातील जवळ - जवळ ३० वर्षे अंगणवाडीचे शिक्षणवर्ग प्राथमिक शाळेत चालू राहिले. अंगणवाडी अध्यापनाचे तंत्र माहित असलेला शिक्षकवर्ग वर्गातील मुलांची भरमसाठ संख्या यामुळे प्राथमिक शाळेतील हे वर्ग रद्द करावेत अशी चळवळ सुरु झाली. २० व्या शतकाच्या दुस-या दशकात बालोद्यान व मॉंटेसरी पध्दतीची ओळख भारतात होवू लागली. त्यामुळे १९१५ मध्ये मुंबई राज्यातील पहिली मॉंटेसरी शाळेची स्थापना बडोदे जिल्ह्यातील वासो या गावी झाली.

महाराष्ट्रात अंगणवाडी शिक्षण देण्यासाठी मिशनरींनी फार मोठया प्रमाणात प्रयत्न केले आहेत. त्यांनी प्राथमिक शाळेलाच एक वर्ग जोडून अंगणवाडी शिक्षणास प्रारंभ केला. सन १८८५ मध्ये पुणे येथे सेंटहिला नर्सरी स्कूल पंचहौद मिशन, पुणे येथे या शिक्षणाच्या शाळा सुरु केल्या. सन १९०० मध्ये सोलापूर येथे किंडरगार्डन ट्रेनिंग स्कूल असे होते. आज या संस्थेचे नाव मेरी बी हार्डींग अध्यापिका विद्यालय असे आहे. मुंबई राज्यात १९२० मध्ये दादर येथे नुतन

बालशिक्षण संघाची स्थापना झाली. या संघाने मुंबई येथे "बाल्कन जी बारी" ही अंगणवाडी शिक्षण देणारी संस्था सुरु केली. सन १९२५ मध्ये भावनगर येथे पहिली मॉंटेसरी परिषद भरली जिजूभाई बधेका व श्रीमती ताराबाई मोडक यांच्या प्रयत्नामुळे खेडोपाडी नूतन बालशिक्षण संघाची स्थापना झाली. श्रीमती मोडक व खाजगी संस्था यांच्या प्रयत्नामुळे खेडोपाडी बालकमंदिर, बालवाडया व शिशुसदने मोठया प्रमाणात निघण्यास सुरुवात झाली.

सन १९३७ मध्ये लोकनियुक्त मंत्रीमंडळ सत्तारुढ झाल्यावर या अंगणवाडी शाळांना शासन मान्यता व अनुदान देण्याची प्रथा सुरु झाली. त्याकरिता खास निराळे नियम मात्र बनविण्यात आले नाहीत. खासगी माध्यमिक शाळांना अनुदान देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या अनुदान नियमावलीतील तरतुदीनुसारच त्यांना खास संस्था म्हणून मान्यता देण्यात येवू लागली व तेंव्हा पासून या संस्थाना मान्य खर्चाच्या २५ टक्के अनुदानही मिळू लागले.

महाराष्ट्रातील ग्रामीण विभागात व मागासलेल्या मुलांसाठी या शिक्षणाचा उपयोग व्हावा म्हणून ठाणे जिल्ह्यातलि बोर्डी या ठिकाणी नूतन बालशिक्षण संघाचे ग्रामीण केंद्र सुरु केले सन १९४५ मध्ये शिक्षणमंत्री श्री.बाळसाहेब खैर यांनी "ग्राम बाल शिक्षण केंद्राचे" उद्घाटन केले. बोर्डी येथील हे केंद्र श्रीमती ताराबाई मोडक यांच्या मार्गदर्शनाखाली चालत होते.

"बोर्डीगच्या ग्राम बाल शिक्षण केंद्राकडे महाराष्ट्र शासन "खास" अनुदान देत आहे. मध्यवर्ती सरकारने अधिकारी येथील बालवाडीचे कार्य पाहण्यास येत असतात. श्रीमती अनुताई वाघ इत्यादी यांचे कार्य आदिवासी विभागात नेटाने घालवित आहेत. बोर्डीजवळील कोतवाडा शाळा व अंगणवाडया अशा अनेक संस्था कार्य करीत आहेत. या संस्थामध्ये सध्या आठवते विद्यार्थी आहेत. [७]

---

७) पारसनीस न.रा. "शिक्षणाची तात्वीक व समाजशास्त्रीय भूमिका"
पुणे : नुतन प्रकाशन - प्रथम आवृत्ती १९८७ पा.क्र. ३२२.

"स्वातंत्र्योत्तर काळात मुंबई राज्य सरकारने १९४९ साली श्रीमती सुलभाबाई पाणंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली अंगणवाडी शाळाचे कार्य व त्यांना दयावयाचे अनुदान यांची पाहणी करण्यासाठी एक समिती नेमली होती. त्या समितीने या शाळांना अधिक अनुदान दयावे अशी शिफार केली होती. त्याप्रमाणे १९४९ - ५० पासून अनुदान चाळीस टक्के दयावे असे सरकारने ठरविले होते. परंतु १९५० - १९५१, १९५१ - १९५२ मध्ये आर्थिक टंचाईमुळे सरकारने ते साडेसतोतीस व पंचवीस टक्क्यावर आणले. १९५२ - १९५३ पासून तर सरकारने अनुदान देण्याचे पूर्णतया बंद केले."[८]

शासनाने १९५२ - १९५३ पासून अनुदान देण्याचे बंद करुन सरकारने या संस्थासमोर जीवन - मरणाचा प्रश्न उपस्थित केला. परंतु समाजातील काही शिक्षणप्रेमी संस्थानी विना - अनुदान तत्वावर या शाळा चालू ठेवण्याचे कार्य सुरु ठेवले. तसेच नवनवीन अनेक संस्थाचालकांनी समाजातील स्तरावरील मुलांच्या गरजा लक्षात घेवून अंगणवाडी शाळा सुरु करण्याचे कार्य चालू ठेवणे व आजही ते कार्य चालू आहे. त्यामुळेच आज गावोगावी व शहरात या शाळा चालू आहेत.

सन १९५२ - १९५३ पासून शिक्षणाच्या सर्व बाबीवर होणारा खर्च मागून जी रक्कम उरेल ती अंगणवाडी शिक्षणासाठी खर्च करावयाची असे शासकीय धोरण असल्यामुळे राज्यात अंगणवाडी शिक्षणाच्या क्षेत्रातील प्रगती फारशी समाधानकार नाही. तिस-या पंचवार्षिक योजनेच्या काळात "बालवाडीयोजना" तयार करण्यात आली होती. त्या योजनेचा समावेशही पंचवार्षिक योजनेत केला होता. परंतु इतर शैक्षणिक बाबींवरील खर्चाना अग्रस्थान दिले गेल्याने ही योजना मागे पडली व त्यांचा परिणाम चौथ्या पंचवार्षिक योजनेतही अंगणवाडी शिक्षण दुर्लक्षित राहिले.

---

८) जोशी ग.ब. "शैक्षणिक प्रशासन" पुणे : जोशी प्रकाशन प्रथम आवृत्ती १९६१ पा. क्र. २११.

सन १९६८ मध्ये महाराष्ट्र राज्यातलि अंगणवाडी शिक्षणाबाबत एक अहवाल प्रसिध्द करण्यात आला. या अहवालात या शिक्षणाबद्दल पुढील प्रमाणे विचार मांडले होते. "शिक्षण पध्दतीमध्ये अंगणवाडी शिक्षणाचे महत्व मान्य करुनही या शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य खाजगी संस्थाकडे सुपुर्द करणे अपरिहार्य आहे. कारण चौदा वर्ष वयापर्यंतच्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबद्दलच्या घटनेत आदेशाची पूर्तता करणे आतापर्यंत शक्य झाले नाही सरकारी अहवालातील हे सत्य बाजूला करुन चालणार नाही. घटनेच्या ४५ व्या कालक्रमानुसार प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी राज्य सरकारवर टाकण्यात आली."[८]

प्राथमिक शिक्षणाचे कार्य इतके प्रचंड आहे की, अंगणवाडी शिक्षणासारख्या महत्वाच्या बाबींवर खर्च करण्यास शासनाकडे पैसा उपलब्ध होणे अशक्य आहे. म्हणूनच अंगणवाडी शिक्षणाच्या प्रसाराचे कार्य प्रामुख्याने खाजगी संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थाकडे सोपविण्याशिवायच गत्यंतर नव्हते असे दिसून येते. शासन या शाळांना अनुदान देत नसल्याने व त्यांची तपासणी राहिले नाही. स्थानिक संस्थानी व अंगणवाडी अध्यापन केलेल्या व न केलेल्या व्यक्तिनी अल्प स्वरुप वेतन स्वीकारुन या संस्था जगविण्याचे कार्य करीत आहेत. विद्यार्थ्याकडून 'फी' च्या रुपाने केंद्रिय समाजकल्याण मंडळ इत्यादी संस्थाकडून मिळणारे अनिश्चित अनुदान आणि देणा-यखा याच या शळांच्या उत्पन्नाच्या बाबी आहेत.

२३ फेब्रुवारी १९७० मध्ये महाराष्ट्र शासनाने अंगणवाडी शिक्षणाविषयी धोरण जाहिर करतांना ५००० पेक्षा कमी लोकवस्ती असलेल्या गावात व शहरातील दुर्लक्षित लोकवस्तीमध्ये किंवा समाजातील भागात थरातील मुलांसाठी अंगणवाडी शाळा चालविण्यास ग्रामपंचायत व खासगी संस्थाना अनुदान देण्यात येईल असे जाहीर केले होते.

महाराष्ट्र शासनाच्या या धोरणामुळे अंगणवाडी शिक्षणाबाबत शासनाचे प्रयत्न मर्यादित राहणार आहेत. तेंव्हा समाजातील श्रीमंत देणगीदार व्यक्ति व संस्था स्वयंमसेवी संस्थानी पुढे होवून या शाळा चालविण्यास तयार झाले पाहिजे. तसेच आपल्याकडील पालकवर्ग अद्यापही म्हणावा तसा बालशिक्षणाबाबत जागृत नाही व असला तरी आर्थिक परिस्थितीमुळे आपल्या पाल्यात ते शिक्षण देणे त्यांना परवडत नाही. यासाठी निमसरकारी पातळीवरच अंगणवाडी शिक्षणाचा प्रसार होणे महाराष्ट्रात आर्थिक जरूरीचे आहे.

महाराष्ट्रात या शिक्षणाचा प्रसार जसजसा होत जाईल तसतसे अंगणवाडी शिक्षणाचे महत्व पालकांना पटू लागले. समान शिक्षणाच्या योजने मुळेही लोकमानस तयार होण्यास मदत होईल. पालकांना अंगणवाडी शाळेत मुलांना पाठविण्याचा खर्च परवडणारा नसल्याने प्राथमिक शाळांनाच अंगणवाडी शाळा जोडाण्यात आणि या शखाळ निशुल्क चालवण्यात तरच या शिक्षणाचा प्रसार आधिक प्रमाणात होईल.

## ३.६ *सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी शिक्षणाचा इतिहास*

अमेरीकन मराठी मिशन संस्थेने सोलापूर शहरात इ.स. १९०० मध्ये जोसेफिन किंडरगार्डन मराठी माध्यमाच्या पहिल्या बालवाडीची स्थापना केली. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील अंगणवाडी शिक्षणाची सुरूवात या शाळेपासूनच झाली आहे. बालवाडीतील प्रशिक्षित शिक्षकांची गरज लक्षात घेऊन या संस्थेने १ जून १९०१ मध्ये मेरी बी हार्डिंग अध्यापन पूर्व पदविका या प्रशिक्षण संस्थेची सुरूवात केली. या संस्थेने तेंव्हापासून ते आजतगायत अंगणवाडी शिक्षणाचे कार्य सातत्याने चालू ठेवले आहे.

सन १९४० च्या सुमाराचा काळ हा भारतात आणि विदेशामध्येही अंगणवाडी शिक्षणाच्या दृष्टीने महत्वाचा होता. सा-या जगभर या स्तरावरील

विशेषता स्त्रीया ह्या नवीन पर्वात फार उत्साहाने सहभागी झाल्या होत्या. मॉंटेसरी शिक्षणाची ज्योत सौ. अवंतीबाई केळकर व त्यांचे पती जनुभाई केळकर यांनी १९४५ मध्ये सोलापूरात आणली. त्याकाळी सोलापूरमध्ये तीन - चार वर्षाच्या मुलांची शाळाही कल्पनाच नवीन होती. परंतु सौ.केळकरांनी घरोघरी हिंडून कसेबसे १० - १२ मुले गोळा करुन भगिनी समाजाच्या हॉलमध्ये त्यांनी बालविकास मंदिराची ९ सप्टेंबर १९४५ ला सुरुवात केली. १५ जानेवारी १९४७ पासून सरकारि मान्यता मिळाली.

या बालविकास मंदिराची स्थापना झाल्यापासून ते आजपर्यंत शेकडो बालकांना शिक्षण देवून बालविकास मंदिराने आपले उल्लेखनीय कार्य समाजापुढे ठेवले आहे. २७ ऑक्टोबर १९८८ या दिवशी केळकर दांपत्य आणि बालविकासाची कार्यकारणी यांनी संस्थेच्या संचालकाचे दायित्व ज्ञान प्रबोधिनी पुणे या ध्येयवादी प्रयोगशील शिक्षण कार्यकर्त्यांकडे सोपविले आहे.

अंगणवाडी शिक्षणाचे महत्व लक्षात घेवून अनेक खाजगी संस्थानी १९४६ ते १९५० या काळात तीन बालवाडया सुरु करण्यात आल्यात. १९७१ नंतर अंगणवाडी शाळांना अधिक प्रेरणा मिळाली त्यामुळे अनेक बालवाडया सुरु करण्यात आल्या आहेत.

अंगणवाडी शिक्षणाचा प्रसार हा शहरी विभागात मोठया प्रमाणात होत होता. या शिक्षणासाठी जबर फी धावी लागत असल्यामुळे फक्त श्रीमंताच्या व उच्च मध्यमवर्गीयाच्या मुलानांच या शिक्षणाचा फायदा मिळत होता. ग्रामीण विभागातील व शहरी विभागातील झोपडपट्टयातील मुलांना या शिक्षणाचा लाभ मिळत नव्हता.

शहरी विभागातील झोपडपट्टी व मागासलेल्या विभागातील मुलांना या शिक्षणाची संधी मिळावी म्हणून महाराष्ट्र समाज - कल्याण खातयाने सोलापूर शहरातील मान्यताप्राप्त गलिच्छ वस्त्यामध्ये जुलै १९७९ मध्ये प्रायोगिक तत्वावर

२१ अंगणवाडया सुरु केल्या गलिच्छ वस्त्यांची संख्या जसजशी वाढत गेली. त्या प्रमाणात या खातयाने अंगणवाडीची ही संख्या वाढवण्यात आली. त्यामुळे आज या खात्यातर्फे १०० अंगणवाडया चालविल्या जात आहेत.

ग्रामीण विभागातील मुलांनाही या शिक्षणाची संधी मिळावी या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने जून १९८२ पासून सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण विभागात एक शिक्षिकी शाळेत ९५ बालवाडया सुरु केल्या आहेत. महाराष्ट्र शासनाचे हे कार्य पाहून सोलापूर जिल्हा परिषदेनेही ग्रामीण विभागात जून १९४८ पासून सुरुवातीस २५ बालवाडया सुरु केल्या. या बालवाडयांना मिळणारा प्रतिसाद व ग्रामीण विभागातील लोकांची मागणी लक्षात घेवून जिल्हा परिषदेने १९८५ मध्ये ९२ बालवाडया व १९८८ मध्ये परत २३ बालवाडया सुरु केल्या आहेत. त्यामुळे मार्च १९८९ अखेर पर्यंत जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण विभागात १४० बालवाडया चालविल्या जात आहेत.

युनिसेफने १९८४ मध्ये सोलापूर शहरातील मागासलेल्या झोपडपट्टीतील लोकांच्या कल्याणासाठी व लहान मुलांना चांगले संस्कार करण्याच्या उद्देशाने बालमंदिरे सुरु केली. युनिसेफने ३१ मार्च १९८७ पासून या मंदिराचे प्रशासन सोलापूर महानगरपालिकेकडे सोपविले आहे. आज सोलापूरात आपल्या शहरातील मागासलेल्या विभागात ६० बालमंदिरे आहेत.

सोलापूर जिल्ह्यात एकात्मिक बाल विकास योजना १९८२ पासून सुरु झाली. प्रथम पंढरपूर तालुक्यात सुरुवात करणेत आली १९८९ पासून उत्तर सोलापूरात सुरुवात करणेत आली. दक्षिण सोलापूर तालुक्यात १९९० पासून सुरुवात करण्यात आली. अक्कलकोट व बार्शी मध्ये १९९३ - १९९४ पासून माळशिरस तालुक्यात बँक प्रकल्पांतर्गत मोहोळ, सांगोला तालुक्यात १९९४ - १९९५ पासून माढा, करमाळा, तालुक्यात १९९५ - १९९६ मध्ये मान्यता देण्यात आली.

अशा प्रकारे सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यात प्रकल्प कार्यान्वित होणेची प्रक्रिया होत आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यात १९८९ मध्ये १७९ अंगणवाडया सुरु करण्यात आली आहे. या प्रमाणे सोलापूर जिल्ह्यात सध्या २०७३ अंगणवाडया सुरु आहेत.

## ३.६.१ दक्षिण सोलापूर तालुक्यातील अंगणवाडी

सोलपूर जिल्ह्यातील ग्रामीण विभागातही या वयोगटातील मुलांवर चांगले संस्कार आरोग्य विषय सवयी, प्राथमिक शाळेतील बालकांची अनुपस्थिती कमी करण्यासाठी केंद्रशासन पुरस्कृत एकात्मिक बालविकास योजनेनुसार १९८२ पासून अंगणवाडी सुरु करण्यात आली. प्रथम पंढरपूर तालुक्यात सरूवात करण्यात आली. १९८९ पासून उत्तर सोलापूर करण्यात आली.

दक्षिण सोलापूर तालुक्यात १९८९ मध्ये सुरु करण्यात आली. दक्षिण सोलापूर तालुक्यात १९८९ साली १७९ अंगणवाडया सुरु करण्यात आली. परंतु आता सध्या २००३ व २००४ पर्यंत संख्यात व प्रमाणात वाढ झालेली आहे. २००३ व २००४ पर्यंत दक्षिण सोलापूर तालुक्यात एकूण ८६ गावामध्ये १८१ अंगणवाडया सुरु आहेत.

अंगणवाडी शासनामार्फत चालविण्यात येणा-या अंगणवाडी शिक्षिका त्यांची दरमहा १४००/- रुपये वेतनावर नेमणूक केली जाते. प्रत्येक अंगणवाडीत ७४०/- रुपये वेतनावर एक मदतनीस स्त्री सेविकेचीही नेमणूक करण्यात येते. या अंगणवाडीतील मुलांना मधल्या सुट्टीत या योजनेतर्फे अल्पोपहार दिला जात नाही. मुले घरुनच डबे आणत असतात. मुलांकडून कोणत्या प्रकारची फी घेतली जात नाही. दक्षिण सोलापूर तालुक्यातील अंगणवाडीमध्ये तीन ते पाच वयोगटातील मुलांची संख्या ६७६६८ इतकी आहे.

## कोष्टक क्रमांक २

## दक्षिण सोलापूर तालुक्यातील अंगणवाडी शाळा

| अनुक्रमांक | गावाचे नांव | अंगणवाडी शाळांची संख्या |
|---|---|---|
| १ | बंकलगी | २ |
| २ | आहेरवाडी | २ |
| ३ | होटगी | ४ |
| ४ | बोरामणी | ७ |
| ५ | सगंदरी | १ |
| ६ | मुळेगांव | २ |
| ७ | मुळेगांव तांडा | २ |
| ८ | ब.हिप्परगे | २ |
| ९ | वडजी | २ |
| १० | वरळेगांव | १ |
| ११ | कुंभारी | ९ |
| १२ | दर्गन हळ्ळी | १ |
| १३ | दोड्डी | १ |
| १४ | दोड्डी तांडा | १ |
| १५ | फताटेवाडी | १ |
| १६ | तांदूळवाडी | २ |
| १७ | मुस्ती | ६ |
| १८ | पिंजारवाडी | १ |

| | | |
|---|---|---|
| १९ | चापला तांडा | ७ |
| २० | वळसंग | ७ |
| २१ | आचेगांव | ५ |
| २२ | चिंचोळी | २ |
| २३ | रामपूर | २ |
| २४ | वडगांव | १ |
| २५ | दिंडूर | १ |
| २६ | कर्देहळ्ळी | २ |
| २७ | तोगराळी | १ |
| २८ | गर्देहळ्ळी | १ |
| २९ | हणमगांव | १ |
| ३० | शिंगडगांव | २ |
| ३१ | धोत्री | ३ |
| ३२ | शिर्पनहळ्ळी | १ |
| ३३ | इंगळगी | १ |
| ३४ | बोरूळ | १ |
| ३५ | तिलेहाल | १ |
| ३६ | कणबस | २ |
| ३७ | शिरवळ | २ |
| ३८ | आलेगाव | १ |
| ३९ | औज | १ |
| ४० | यत्नाळ | १ |
| ४१ | वडापूर | २ |

| | | |
|---|---|---|
| ४२ | अंत्रोळी | २ |
| ४३ | मणगोळी | १ |
| ४४ | गुर्जेगाव | १ |
| ४५ | अकाले मं. | १ |
| ४६ | कंदलगाव | ४ |
| ४७ | गावडेवाडी | १ |
| ४८ | मंद्रूप | १० |
| ४९ | बसवनगर | १ |
| ५० | येळेगांव | १ |
| ५१ | माळकवठा | २ |
| ५२ | औज | २ |
| ५३ | कारकल | १ |
| ५४ | लवंगी | २ |
| ५५ | सादेपूर | १ |
| ५६ | बाळगी | १ |
| ५७ | उळे | ३ |
| ५८ | उळेवाडी | १ |
| ५९ | कासेगांव | ४ |
| ६० | गंगेवाडी | १ |
| ६१ | औराद | ३ |
| ६२ | राजूर | १ |
| ६३ | बिरनाळ | १ |
| ६४ | होनमुर्गी | २ |

| | | |
|---|---|---|
| ६५ | बोळकवठा | २ |
| ६६ | संजवाड | १ |
| ६७ | वांगी | १ |
| ६८ | हत्तरसंग | १ |
| ६९ | कुडल | १ |
| ७० | टाकळी | २ |
| ७१ | सलगर वस्ती | १ |
| ७२ | बरुर | २ |
| ७३ | चिंचपूर | १ |
| ७४ | कुरघोट | १ |
| ७५ | नांदणी | १ |
| ७६ | हत्तुर | ६ |
| ७७ | मद्रे | १ |
| ७८ | आनंदनगर | १ |
| ७९ | इ.ल.तांडा | १ |
| ८० | कु.तांडा | १ |
| ८१ | वडकबाळ | १ |
| ८२ | वांगी | २ |
| ८३ | भंडारकवठे | ६ |
| ८४ | तेलगांव | १ |
| ८५ | खानापूर | १ |
| ८६ | कुसूर | २ |
| ८७ | विंचूर | २ |

| | | |
|---|---|---|
| ८८ | शंकरनगर | १ |
| ८९ | निंबर्गी | ४ |

### ३.६.२ *महाराष्ट्र समाज कल्याण खाते*

महाराष्ट्र शासनाने १९७९ मध्ये शहरी विभागातलि मान्यताप्राप्त गलिच्छ वस्त्यामध्ये अंगणवाडया सुरु करण्यासाठी दहा शहरांची निवड केली होती. या दहा शहरामध्ये सोलापूर शहराचा समावेश होता. समाजकल्याण खात्याने जुलै १९७९ मध्ये सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील मान्यता प्राप्त गलिच्छ वस्त्यांमध्ये प्रायोगि तत्वावर सुरुवातीला एकवीस अंगणवाडया सुरु करण्याचे उद्देश पुढील प्रमाणे आहेत.

१) ० ते ६ वयोगटातील मुलांना सकस आहार पुरवून त्यांची प्राकृतिक उन्नती साधण्यासाठी.

२) प्राथमिक शाळेतील अनुपस्थिती कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

३) बालसंगोपन, आहार व आरोग्य यांच्या दृष्टीकोनातून मातांना शिक्षण देणे व त्या मातांची याबाबतीत कार्यक्षमता वाढविणे.

४) मुलांची मानसिक व शारिरीक उन्नतीच्या दृष्टीने आधारभूत जोपासना करणे.

५) बालकांची सर्वंकष उन्नती साधण्याच्या दृष्टीने संबधित खात्याची मदत व सहकार्य देणे.

सोलापूर जिल्ह्यात मान्यताप्राप्त गलिच्छ वस्त्यांची संख्या जसजशी वाढत गेली. त्याप्रमाणे या अंगणवाडयांची संख्याही वाढविण्यात येत होती. मार्च १९८९ अखेर पर्यंत १०० अंगणवाडया चालविण्यात येत आहेत. आज १९८९ अखेर पर्यंत १२३ गलिच्छ वस्त्या आहेत. त्यामुळे येथील समाज कल्याण खात्याने अंगणवाडी

गरज लक्षात घेउन  शासनाकडे ५० अंगणवाडीचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविला आहे.

या खात्यातर्फे चालविण्यात येणा-या १०० अंगणवाडया सेविका नेमण्यात आल्या आहेत. या १०० केंद्रावर पर्यवेक्षक ठेवण्यासाठी चार पर्यवेक्षकाची नेमणूक करण्यात आली आहे. त्याप्रमाणे प्रत्येक अंगणवाडी केंद्रावर एक स्त्री मदतनीस दरमहा वेतनावर नेमण्यात आली आहे. सेविकांची नेमणूक करताना माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण झालेल्या स्त्री शिक्षिकेचीनेमणुक करण्यात येते. डी.एड्. व मॉंटेसरी ट्रेंड शिक्षिका मिळाल्यांवर त्यांना अधिक प्राधान्य देण्यात येते.

### ३.६.३ *महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ*

सोलापूर शहरातील व ग्रामीण भागातील मान्यताप्राप्त कारखान्यातील कामगारांच्या तीन ते पाच वयोगटातील मुलांसाठी महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळामार्फत १९५३ च्या कामगार कल्याण कायद्यानुसार सोलापूर शहरातील व ग्रामीण भागातील १९५३ मध्ये या मंडळामार्फत शिशुसदन सुरु करण्यात आले. शहरातील व ग्रामणि भागातील कामगाराच्या मुलांची संख्या जसजशी वाढत गेली. त्यानुसार शिशु सदनांची संख्याही वाढविण्यात आली. त्यानुसार शिशुसदनांची संख्याही वाढविण्यात आली. त्यामुळे मार्च १९८९ अखेरपर्यंत सोलापूर शहरात या मंडामार्फत २० शिशुसदने व बार्शी शहरात दोन शिशुसदने चालविण्यास येत आहेत.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ हे निम्न (अर्ध) सरकारि मंडळ आहे. या मंडळामार्फत शहराच्या निरनिराळया परिसरात १५ केंद्र स्थापन करुन त्या केंद्रामध्ये २० शिशुसदने चालविली जात आहेत. या शिशुसदनासाठी इमारती बांधण्यात आल्या आहेत. कार्यालयीन कर्मचारी वर्ग व शिशुसदनात काम करणा-या शिक्षिका यांचा पगार या मंडळामार्फत केला जातो. या शाळांवर

नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा कामगार कल्याण अधिकारी यांची नेमणूक केली आहे.

या शिशुसदनात प्रवेश देताना प्रथम कामगारांच्या मुलांना प्राधान्य दिले जाते. मुलांची संख्या ४० ते ४५ पर्यंत आहे. या शाळांमध्ये प्रत्येक मुलांकडून दरमहा दोन रुपये फी घेतली जाते. तसेच १००० रु. पर्यंत पगार असणा-या कामगारांकडून सहा महिन्याला एक रुपया व मालकाकडून दोन रुपये जमा केले जातात. रु. १००० पेक्षा जास्त पगार असणा-या कामगाराकडून सहा महिन्याला तीन रुपये व मालकाकडून सहा रुपये जमा केले जातात.

या शिशुसदनातील मुलांना मधल्या सुट्टीत सकस आहार दिला जातो. प्रत्येक मुलांमागे मंडळ दररोज मधल्या सुट्टीत अल्पोपहारासाठी ६० पैसे खर्च केला जातो. त्यामुळे या शाळेत सर्व मुलांना मधल्या सुट्टीत एकाच प्रकारचे जेवण मिळत असते. कोणत्याही मुलाला घरुन डबा आणावा लागत नाही. या मंडळामार्फत इतरही कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. उदा. शिवणकाम वर्ग, आरोग्यविषयक सेवा, कामगारांसाठी व्याख्याने इ.

### ३.६.४ *महाराष्ट्र शासन बालवाडया*

महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागात अंगणवाडी शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्याच्या उद्देशाने प्रायोगिक तत्वावर जून १९८२ पासून ९५ बालवाडया सुरु केलया आहेत. या बालवाडयासाठी महाराष्ट्र शासन सोलापूर जिल्हा परिषदेला अनुदान देत असते. या ग्रामीण बालवाडयांवर सोलापूर जिल्हा परिषदेने शिक्षण खात्याचे नियंत्रण असते.

महाराष्ट्र शासन या बालवाडयांना प्रत्येकी १००० रुपये वार्षिक अनुदान देत असते. या शाळेतील शिक्षिकेची नेमणूक करतांना माध्यमिक शालांन्त परिक्षा उत्तीर्ण असणा-या स्थानिक स्त्री शिक्षिकेला प्राधान्य देण्यात येते. या

बालवाडयांमधील शिक्षिकेची नेमणूक १० महिन्यासाठी (जून ते मार्च) करण्यात येत असते. दरवर्षी नवीन नेमणूक या शाळांमध्ये करण्यात येत असते. नवीन नेमणूक करतांना पूर्वीच्या शिक्षिकेला प्रथम प्राधान्य देण्यात येत असते.

महाराष्ट्र शासनाने सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लोकांची मागणी लक्षात घेवून तालुक्यात तालुकानिहाय चालविण्यात येणा-या बालवाडी शाळांची संख्या ९५ पर्यंत आहे.

## ३.६.५ *जिल्हा परिषद बालवाडया*

ग्रामीण भागात बालवाडी शिक्षणाचा प्रसार व प्रचार होण्यासाठी तसेच या स्तरावरील शिक्षणाचा लाभ सर्व स्तरातील मुलांना व्हावा म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीच्या २/१/१९८४ च्या सभेत जिल्हा परिषद फंडातून जून १९८४ पासून सुरुवातीस प्रायोगिक तत्वावर २५ बालवाडया सुरु केल्या आहेत.

जिल्हा परिषदेने ग्रामीण भागात सुरु केलेल्या बालवाडयांना चांगला प्रतिसाद मिळाल्यावर दुस-या वर्षी १९८५ मध्ये परत काही बालवाडया सुरु करण्यात आल्या होत्या. याप्रमाणे मार्च १९८८ पर्यंत सोलापूर जिल्ह्यात ११७ बालवाडया सुरु करण्यात आल्या होत्या. ग्रामीण भागातलि लोकांची मागणी लक्षात घेवून जून १९८८ मध्ये परत २३ बालवाडया सुरु करण्यात आल्यात त्यामुळे १९८८ - ८९ अखेरपर्यंत सोलापूर जिल्ह्यातील केंद्र शाळ व एक शिक्षकी शाळामध्ये १४० बालवाडया चालविल्या जात आहेत.

या बालवाडीसाठी प्रशिक्षित शिक्षिकेची उपलब्ध होण्याची वाट न पाहता त्याच गावातील माध्यमिक शालान्त परिक्षा उत्तीर्ण झालेल्या स्त्री शिक्षकांचीनेमणूक दरमहा १०० रुपये वेतनावर १० महिन्यासाठी करीत असते. तसेच या शाळेतील मुलांसाठी काही रक्कम बाल साहित्यावर खर्च करीत असते. तसेच या शाळेतील मुलांसाठी काही रक्कम बाल साहित्यावर खर्च

करीतर असते तसेच या शाळा निशुल्क चालविल्या जात आहेत. सोलापूर जिल्हा परिषदेने जिल्ह्यातील सुरु केलेला हा उपक्रम अतिशय कौतुकास्पद आहे असे म्हणावे लागेल जिल्हा परिषदेने जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील ग्रामीण भागातील  समस्या लक्षात घेवून बालवाडया सुरु केल्या आहेत. तालुका निहाय्य सुरु करण्यात आलेल्या बालवाडयाची संख्या समाधानकार नाहीत त्यांत सुधारणा होणे आवश्यक आहे.